प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

Department of Communication, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022- 22660502

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email: helpdoc@rbi.org.in

1 ऑगस्ट 2020

**बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 (एएसीएस्), कलम 35 A अंतर्गत निर्देश- शिवम सहकारी बँक लिमिटेड, ईचलकरंजी, कोल्हापूर, महाराष्ट्र**

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक 18 मे 2018 रोजी दिलेल्या निर्देश सं. DCBS.CO.BSD-I/D-6/12.22.351/2017-18 च्या अनुषंगाने महाराष्ट्र, वर दिनांक 19 मे 2018 ची कार्यालयीन वेळ संपल्यापासून दिशानिर्देश लादण्यात आले होते. निर्देशांची वैधता वेळोवेळी वाढवण्यात आलेली आहे आणि ह्या निर्देशांचा वैधता कालावधी, गेल्या वेळेस दिनांक 21 मे 2020, च्या सुधारित निर्देश सं DOR.CO.AID/D-81/12.22.351/2019-20 अनुसार 31 जुलै 2020 पर्यंत वाढवण्यात आलेला आहे जो बँकेच्या आर्थिक आढाव्यावर पुनरावलोकनाधीन असेल.

2. जनतेच्या माहितीसाठी सुचना देण्यात येत आहे की, भारतीय रिझर्व्ह बँक, बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 कलम 56 चे वाचन करीता, कलम 35 A, उप कलम (1) अनुसार, आपल्या प्रदत्त अधिकाराचा वापर करून असा आदेश देत आहे की उपरोक्त दिनांक 18 मे 2018 रोजी दिलेल्या निर्देश सं. DCBS.CO.BSD-I/D-6/12.22.351/2017-18 व नंतर वेळोवेळी दिलेल्या सुधारित निर्देशा अनुसार निर्देशाचा वैधता कालावधी जो दिनांक 31 जुलाई, 2020 पर्यंत वाढवला होता, तो दिनांक 24 जुलै 2020, च्या सुधारित निर्देश सं. DOR.CO.AID/D-5/12.22.351/2020-21 द्वारा दिनांक 01 ऑगस्ट 2020 ते दिनांक 31 ऑक्टोबर 2020 पर्यंत तीन महिन्यासाठी वाढवला आहे, जो बँकेच्या आर्थिक आढाव्यावर पुनरावलोकनाधीन असेल.

3. संदर्भाधीन निर्देशातील इतर कोणत्याही नियम आणि अटी, बदललेल्या नाहीत. दिनांक 24 जुलै 2020 च्या सुधारित निर्देश सं. DOR.CO.AID/D-5/12.22.351/2020-21 याची प्रत बँकेच्या जागेत जनतेच्या माहितीसाठी लावण्यात आलेली आहे.

4. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या उपरोक्त मुदत वाढीमुळे आणि/किंवा निर्देशातील परिवर्तनामुळे जनतेने असे गृहीत धरू नये की, बँकेच्या आर्थिक स्थितीवर भारतीय रिझर्व्ह बँक समाधानी आहे.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाप्रबंधक

**प्रेस प्रकाशनी: 2020-2021/130**